(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात

नागपूर खंडपीठ : नागपूर

पहिले अपील क्रमांक २८९ /२००८

ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड,

मार्फत, विभागीय व्यवस्थापक,

पाम रोड, सिव्हिल लाइन्स, नागपूर .... **अपीलकर्ता**

--- विरुद्ध ---

१. गं.भा.पुनम दिपेंद्र तिवारी,

वय: सुमारे ३५ वर्षे, व्यवसायः घरकाम.

२. कु. पुजा दिपेंद्र तिवारी,

वय:१३ वर्षे, व्यवसायः शिक्षण.

३. चि. प्रतिक दिपेंद्र तिवारी,

वय: सुमारे ६ वर्षे, व्यवसायः काही नाही.

उत्तरवादी क्र. २ आणि ३ अल्पवयीन, मार्फत,

त्यांच्या पालक आई (उत्तरवादी क्रमांक १).

४. प्रेमशंकर रामप्रसाद तिवारी,

वय ६० वर्षे, व्यवसायःकाही नाही.

उत्तरवादी क्रमांक ४ चे कायदेशीर वारसदारः

४-i) राजेंद्र प्रेमशंकर तिवारी, वय ३४ वर्षे.
४-ii) विरेंद्र प्रेमशंकर तिवारी,
वय: ३२ वर्षे,
दोघेही राहणार: मुक्काम पोस्ट: रोहना,
दहिहंडा, अकोला.

४-iii) श्रीमती मिना राजेंद्र तिवारी,
वय ३६ वर्षे, राहणार: सिंधी कॅम्प,
कारंजा लाड, वाशिम.

४-iv) किरण अनुप दुबे,
वय: सज्ञान,
राहणार: 'विसावा' सदनिका, गड्डाम प्लॉट्स,
अकोला.

५. सौ. त्रिवेणी प्रेमशंकर तिवारी,
वय ५२ वर्षे, व्यवसायः काही नाही.
सर्व राहणार: रोहना, पोस्ट : दहिहंडा,
तालुका आणि जिल्हा अकोला.

६. शेख साबीर, एस.जबीर,
वय: सज्ञान, व्यवसायः --
राहणार: हातरून, तालुका: बाळापूर,
सध्या राहणार दहिहंडा, तालुका आणि जिल्हा अकोला **.........उत्तरवादी**

==

श्री. ए.एम.काझी, ह्यांच्या वतीने श्री. टी.टी.मिर्झा अपीलकर्ता ह्यांचे वकील.

श्री. ओमप्रकाश कशीद, उत्तरवादी क्रमांक १ ते ५ चे वकील.

==

<u>न्यायमंच</u> : **<u>माननीय न्यायमूर्ती श्रीमती उर्मिला जोशी-फाळके.</u>**

<u>निर्णय दिनांक</u> : **<u>२३/०१/२०२३</u>**

<u>घोषित करण्याचा दिनांक</u> : **<u>१५/०३/२०२३</u>**

<u>न्यायनिर्णय:</u>

१. मोटार वाहन कायदा, १९८८ (थोडक्यात, "सदर कायदा") च्या कलम १७३ अन्वये, ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीने (विमा कंपनी) ह्या अपिलद्वारे, मोटार अपघात दावा याचिका क्रमांक २/२००६ मध्ये मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, अकोट, जिल्हा अकोला(न्यायाधिकरणाचे विद्वान सदस्य) यांनी दिलेल्या ३.१.२००८ च्या न्यायनिर्णयाला आणि निवाड्याला आव्हान दिले आहे, ज्यामुळे विमा कंपनीला रुपये ३,९६,०००/- सह ९% वार्षिक दराने व्याज, याचिकेच्या तारखेपासून ते पूर्तता होईपर्यंत, नुकसान भरपाई देण्यास जबाबदार धरले आहे.

२. संक्षिप्त माहिती अशी आहे की दिनांक ४.११.२००५ रोजी उत्तरवादी क्रमांक १ चे पती दिपेंद्र हे टॅक्सी नंबर एम.एच. -३०-पी-५८९७ ह्या वाहनातून प्रवास करत होते. ते रोहणा स्टॉपवर टॅक्सीत चढले आणि अकोल्याच्या दिशेने निघाले. वाहन टॅक्सी दहिहंडा रोडवरील पाटी शिवारात पोहोचली असता वाहन टॅक्सीचा टायर फुटला आणि गाडी खाली कोसळली. या अभिकथित अपघातात ते गंभीर जखमी झाले आणि त्या दरम्यान त्यांचा मृत्यु झाला. दावेदारांच्या म्हणण्यानुसार, वाहन टॅक्सी चालक वाहतुकीचे नियम आणि कायदे न पाळता भरधाव वेगाने टॅक्सी चालवत होता, परिणामी अपघात झाला. वाहन टॅक्सी ही उत्तरवादी क्रमांक ६ च्या मालकीची होती आणि विमा कंपनीकडे वैधपणे विमा उतरवलेला होता. या अपघाताबाबत भा. द. वी. च्या कलम २७९, ३३७ आणि ३३८ अंतर्गत दहिहंडा पोलिस स्टेशन, अकोला येथे अपराध क्रमांक ७६/२००५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. उत्तरवादी क्रमांक ६ च्या मालकीच्या आणि विमा कंपनीकडे वैधपणे विमा उतरवलेल्या वाहन टॅक्सीच्या चालकाने उतावीळपणाने आणि निष्काळजीपणे वाहन

चालविल्यामुळे हा अपघात झाला असल्याने विमा कंपनी आणि वाहन टॅक्सीचा मालक संयुक्तपणे आणि पृथकपणे नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. त्यामुळे दावेदारांनी विमा कंपनी आणि वाहन टॅक्सीच्या मालकाकडे नुकसान भरपाईची मागणी केली.

३. वाहन टॅक्सीचा मालक / उत्तरवादी क्रमांक ६ आणि विमा कंपनीने अनुक्रमे निशाणी क्रमांक -१९ आणि २१ द्वारे लेखी जबाब दाखल करून या दाव्याला प्रत्युत्तर दिले. वाहन टॅक्सीचा मालक/ उत्तरवादी क्रमांक ६ यांनी मान्य केले आहे की कथित अपघात टायर फुटल्यामुळे झाला आहे, परंतु वाहन टॅक्सी चालकाने उतावीळपणाने आणि निष्काळजीपणे वाहन चालवल्यामुळे हा कथित अपघात झाला असा युक्तिवाद नाकारला आहे.

ज्याअर्थी, विमा कंपनीने दावेदारांचा युक्तिवाद नाकारला आणि बचाव मांडला की वाहन टॅक्सीच्या मालकाला/ उत्तरवादी क्रमांक ६ ला जारी करण्यात आलेली पॉलिसी, मोटार वाहन नियमांच्या व्याप्तीनुसार जारी केलेल्या परवाना अटी व शर्तींच्या अनुषंगाने केवळ प्रवाशांच्या वाहतुकीसाठी वाहन वापरण्याचा समावेश होता. परवान्यानुसार, जास्तीत जास्त केवळ ६ प्रवाशी + १ चालक नेण्याची परवानगी होती, परंतु वाहन चालकाच्या टॅक्सी क्र. एम.एच-३० -पी-५८९७ एकूण ११ प्रवाशांना घेऊन जात होते जे पॉलिसीच्या अटींचे उल्लंघन होते आणि म्हणूनच विमा कंपनी, दावेदारांना नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नाही.

४. न्यायाधिकरणाच्या विद्वान सदस्यांसमोर, पक्षांनी पुरावे सादर केले. दावेदार क्रमांक १ ने निशाणी ३० द्वारे शपथेवर सर-तपासणी दाखल करून स्वतःची साक्ष- तपासणी केली. वाहन टॅक्सीच्या मालक / उत्तरवादी क्रमांक ६ द्वारे कोणताही पुरावा सादर केला गेला नाही. विमा कंपनीच्या वतीने सहायक व्यवस्थापक निळकंठ जागोजी गेडाम या साक्षीदाराची तपासणी करण्यात आली.

५.		अभिलेखावर असलेले पुरावे लक्षात घेतल्यानंतर न्यायाधिकरणाच्या विद्वान सदस्याने असे मत व्यक्त केले की नुकसान भरपाई मंजूर करण्यासाठी दावेदारांनी आपला दावा सबळपणे सादर केला आहे. जेंव्हा की, प्रथम खबरी अहवालातील जबाबाव्यतिरिक्त, टॅक्सी वाहनात ११ प्रवासी होते हे सिद्ध करण्यासाठी इतर कोणताही पुरावा सादर करण्यात आला नाही. शर्तींचे उल्लंघन झाल्याची वस्तुस्थिती सिद्ध करण्याचा भार विमा कंपनी वर होता जो बजावल्या गेला नाही आणि त्यामुळे विमा कंपनी नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहे.

६.	न्यायाधिकरणाच्या विद्वान सदस्याने पारित केलेल्या न्यायनिर्णय आणि निवाड्या मुळे व्यथित आणि असमाधानी असल्याने, संबंधित गुन्ह्यातील वाहनाच्या चालकाकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना नव्हता तसेच चालकाने परवानगीपेक्षा जास्त प्रवासी नेले आहेत या आधारावर विमा कंपनीने प्रस्तुत अपील केले आहे. अशा प्रकारे, पॉलिसीच्या अटी आणि शर्तींचे उल्लंघन झाले आहे हे दिसून येते. त्यामुळे नुकसान भरपाई देण्यास विमा कंपनी जबाबदार नाही.

७.	विद्वान वकील श्री.ए.एम.काझी ह्यांच्या वतीने श्री.टी.टी.मिर्झा, अपीलकर्ता ह्यांचे वकील आणि उत्तरवादी क्रमांक १ ते ५ चे विद्वान वकील श्री.ओमप्रकाश कशीद, ह्यांचे म्हणणे ऐकले. त्यांच्या योग्य मदतीने, मी या खटल्यात असलेला अभिलेख आणि कार्यवाही (R&P) तपासली.

८.	विमा कंपनीच्या विद्वान वकिलांनी सांगितले की या अपघातात दुसऱ्या कोणत्याही वाहनाचा समावेश नव्हता. दहिहंडा पोलिस स्टेशनमध्ये सहायक पोलीस उपनिरीक्षकाने प्रथम खबरी अहवाल दाखल केला आहे. या प्रथम खबरी अहवालात, हे स्पष्टपणे नमूद केले आहे की या अपघातात ७ व्यक्ती जखमी झाल्या आहेत आणि २ व्यक्ती, ज्यांना आधीच रुग्णालयात नेण्यात आले आहे, त्यांची प्रकृती गंभीर आहे, जे पॉलिसीचे उल्लंघन झाल्याचे आणि विमा कंपनी नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नाही हे दर्शविण्यासाठी पुरेसे आहे.

न्यायाधिकरणाच्या विद्वान सदस्याने याचा विचार न करता विमा कंपनीला नुकसान भरपाई देण्यास जबाबदार धरले.

९. आपल्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ, विमा कंपनीच्या विद्वान वकिलांनी लॉ फाइंडर १७६७७२६ मधील सीएमए क्रमांक २२४१ आणि २२४२/२०१६- **दि. ओरिएंटल इन्शुरन्स कं. ली., शोबा टीएसएम कॉम्प्लेक्स, आर.एस.रोड, टाउन रेल्वे स्टेशनसमोर, पालगड, केरळ राज्य - विरुद्ध - एम.अरुल @ अरुलकुमार आणि इतर** या प्रकरणात मद्रास उच्च न्यायालयाने दिनांक ६.३.२०२० रोजी दिलेल्या निर्णयाचा आधार घेतला आहे ज्यामधे असे मानले आहे की न्यायाधिकरण योग्यरित्या निष्कर्षावर पोहोचले की दावेदार नि:शुल्क प्रवासी म्हणून प्रवास करीत होते आणि केवळ लॉरीचा मालक नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहे. त्यांनी असे प्रतिपादित केले की, मद्रास उच्च न्यायालयाचे निरीक्षण आणि सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारे, हे स्पष्ट आहे की वाहन पॉलिसीच्या अटी आणि शर्तींच्या विरोधात चालवले गेले होते आणि म्हणूनच विमा कंपनी कोणतीही नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नाही.

१०. दुसरीकडे, उत्तरवादी क्रमांक १ ते ५ चे विद्वान वकील ओमप्रकाश कशीद यांनी न्यायाधिकरणाच्या विद्वान सदस्याच्या न्यायनिर्णयाचे समर्थन केले आणि सांगितले की कथित उल्लंघन इतके मुलभूत नव्हते आणि म्हणूनच विमा कंपनी नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहे आणि त्यामुळे त्यांनी अपील फेटाळण्याची विनंती केली.

११. हे मान्य आहे की, दावेदारांनी नुकसानभरपाईच्या प्रमाणाला कोणताही उलट आक्षेप दाखल केलेला नाही. विमा कंपनीनेही नुकसानभरपाईच्या प्रमाणाला आव्हान दिलेले नाही. अशा प्रकारे न्यायाधिकरणाच्या विद्वान सदस्याने नुकसानभरपाईच्या रकमेच्या निवाड्यास आव्हान दिले नाही.

१२. याचिकेत समाविष्ट असलेला एकमेव मुद्दा असा आहेः

वाहनाच्या मालकाने पॉलिसीच्या अटी व शर्तींचे उल्लंघन केले असल्याने विमा कंपनीला नुकसान भरपाई देण्याच्या दायित्वातून मुक्त करायचे आहे किंवा नाही ?

१३. दावेदार क्रमांक १ ने निशाणी क्रमांक- ३० द्वारे युक्तिवाद सिद्ध करण्यासाठी स्वतः ची साक्ष-तपासणी केली. तिने या म्हणण्याचा पुनरुच्चार केला की अपघाताच्या दिवशी तिचे पती, टॅक्सी क्र. एम.एच – ३० - पी- ५८९७ ने इतर प्रवाश्यांसह प्रवास करीत होते. या वाहनाचा चालक उतावीळपणाने आणि निष्काळजीपणे गाडी चालवत होता, ज्यामुळे वाहनाचे टायर फुटले. तिने पुढे सांगितले की तिचे पती २० एकर शेतजमीन असलेले शेतकरी होते आणि त्यांच्याकडे त्यांच्या मालकीची ट्रॅक्टर ट्रॉली देखील होती. मृतकाच्या मृत्युमुळे तिने तिचा पती गमावला आहे. आता, शेतीची कामे आणि व्यवसाय एखाद्याची नियुक्ती करून व्यवस्थापित करायचा आहे. तिच्या पतीची कमाई रु.२.०० लाख प्रति वर्ष होती आणि म्हणून ती नुकसान भरपाई प्राप्त करण्यासाठी पात्र आ.प्रस्तुत अपीली मध्ये नुकसान भरपाईच्या प्रमाणाला आव्हान दिले जात नाही हे मान्य आहे. टॅक्सी वाहनाच्या (चालकाच्या) उतावीळपणाच्या आणि निष्काळजीपणाच्या कृतीचा विचार केला, तर ती या घटनेची प्रत्यक्ष साक्षिदार नाही. तिच्या उलटतपासणीतून असे दिसून येते की अपघातानंतर तिने घटनेच्या कथित ठिकाणाला भेट दिली आहे. तिच्या उलट तपासणीतून पुढे असे दिसून येते की वाहन चांगल्या स्थितीत होते तसेच वाहनाचे टायरही चांगल्या स्थितीत होते. विमा कंपनीच्या विद्वान वकिलाने केलेल्या उलटतपासणी दरम्यान, तिने सांगितले की चालकाकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना होता की नाही हे तिला माहित नाही.

१४. टॅक्सी चालकाचे उताविळपणे आणि निष्काळजीपणे वाहन चालविणे सिद्ध करण्यासाठी दावेदारांनी प्रथम खबरी अहवाल निशाणी क्रमांक ४२ आणि घटनास्थळ पंचनामा निशाणी क्रमांक ४३ वर भर दिला आहे. सहायक पोलीस उपनिरीक्षक रामहरी रतिराम पेठे यांनी प्रथम खबरी अहवाल दाखल केला. प्रथम खबरी अहवालाच्या कथनानुसार, त्यांनी या घटनेच्या प्रत्यक्षदर्शींची चौकशी केली, घटनास्थळाचा पंचनामा

केला आणि टॅक्सी चालकाच्या उतावीळपणा आणि निष्काळजीपणामुळे हा कथित अपघात झाल्याचे त्यांना दिसून आले. टायर फुटल्यामुळे हा कथित अपघात झाला यात वाद नाही.

१५. अशा प्रकारे, अभिलेखावर असलेली परिस्थिती हे दाखवण्यासाठी पुरेशी आहे की वाहन उतावीळपणे आणि निष्काळजीपणे चालवले गेले होते, ज्यामुळे टायर फुटले आणि मृतक तसेच इतर जखमी लोकं गंभीररित्या जखमी झाले. अशा प्रकारे, टॅक्सी चालकाच्या उतावीळपणे आणि निष्काळजीपणे वाहन चालवल्यामुळे हा अपघात झाला हे दाखवण्यासाठी अभिलेखावर असलेले पुरावे पुरेसे आहेत.

१६. कथित गुन्ह्यातील वाहन, उत्तरवादी क्रमांक ६ च्या मालकीचे आहे आणि विमा कंपनीकडे वैधपणे विमा उतरविला आहे, ह्या बद्दल कोणताही वाद नाही. टॅक्सीच्या चालकाकडे वैध वाहन चालविण्याचा परवाना नसल्याचा बचाव विमा कंपनीने केला. जेव्हा विमा कंपनी वाहनचालकच्या वैध परवान्याचा विशिष्ट बचाव करण्यासाठी आली, तेव्हा ते सिद्ध करण्याचे ओझे विमा कंपनीवर असते. वाहनचालकाकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना नव्हता हे दाखवण्यासाठी विमा कंपनीने कोणताही पुरावा सादर केलेला नाही हे मान्य आहे. वैध वाहनचालक परवाना नसलेल्या चालकाने वाहन चालवले होते हा युक्तिवाद सिद्ध करण्यासाठी विमा कंपनीने प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अधिकाऱ्यांची तपासणी करायला हवी होती. विमा पॉलिसीच्या अटींचे उल्लंघन झाले आहे हे सिद्ध करणे विमा कंपनीसाठी आवश्यक होते.

१७. **२००४ (३) एससीसी २९७** मध्ये नोंदवलेल्या **<u>नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड विरुद्ध स्वर्ण सिंग आणि इतर</u>** ह्या खटल्यात माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की(सदर कायद्याच्या) कलम १४९ (२) (अ) ची सुरुवात "पॉलिसीच्या विशिष्ट अटींचे उल्लंघन झाले आहे" या शब्दांनी होते. ह्याचा अर्थ असा होतो की विमाकराचा बचाव पॉलिसीच्या अटींवर अवलंबून असेल. आपली दायित्वे टाळण्यासाठी विमा कंपनीने केवळ कलम १४(२) (अ) किंवा (ब) अंतर्गत दिलेल्या अटी पूर्ण केल्या आहेत हे दर्शविणे

आवश्यक आहेच, शिवाय विमेदाराच्या बाजूने उल्लंघन झाले आहे हे स्थापित करणे सुद्धा गरजेचे आहे, म्हणजे त्यांनी विमेदाराने कायद्याचे जाणूनबुजून उल्लंघन केल्याचे सिद्ध करणे आवश्यक आहे. विमेदाराप्रतीचे त्याचे दायित्व टाळण्यासाठी, विमेदार निष्काळजीपणाचा दोषी होता आणि योग्य परवानाधारक चालक किंवा संबंधित वेळी वाहन चालवण्यास अपात्र नसलेल्या व्यक्तीद्वारे वाहनांच्या वापराशी संबंधित पॉलिसीची अट पूर्ण करण्याच्या बाबतीत वाजवी काळजी घेण्यात अपयशी ठरला हे विमाकाराला सिद्ध करावे लागेल.

१८. येथे, सध्याच्या प्रकरणात, विमा कंपनीने प्रादेशिक परिवहन कार्यालयातील कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा गुन्ह्यातील वाहनाच्या चालकाची तपासणी केली नाही. हे लक्षात घेण्यासारखे आहे की विमा कंपनीने असा दावा केला आहे की वाहनाच्या चालकाकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना नव्हता, परंतु परवान्यांशी संबंधित सदर कायद्याच्या कलम १८२ अंतर्गत चालकाच्या विरोधात कोणताही अपराध नोंदवला गेला नाही.

१९. विमा कंपनीचा आणखी एक बचाव असा होता की टॅक्सीचा चालक क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेऊन जात होता. हे म्हणणे सिद्ध करण्यासाठी विमा कंपनीने निशाणी क्रमांक ६६ द्वारे सहायक व्यवस्थापक निळकंठ जागोजी गेडाम या त्यांच्या अधिकाऱ्याची चौकशी केली आहे. परवान्यानुसार वाहनात केवळ ६ प्रवासी आणि चालकाला परवानगी होती, असा मुद्दा त्यांनी पुढे आपल्या म्हणण्यात मांडला. मात्र, या वाहनात ९ प्रवासी प्रवास करत असल्याचे पोलिसांच्या कागदपत्रांवरून दिसून येते. अशा प्रकारे, वाहनाच्या मालकाने पॉलिसीच्या अटी आणि शर्तींचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे विमा कंपनी नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नाही.

२०. म्हणून, निशाणी क्रमांक ४४ मध्ये असलेल्या विशिष्ट कंत्राटी गाड्यांच्या संदर्भात परवाना पाहणे आवश्यक आहे. या दस्तऐवजात असे दिसून आले आहे की जास्तीत जास्त केवळ ६ प्रवाशी + १ चालक नेण्याची परवानगी होती. हे मान्य आहे की,

गुन्ह्यातील वाहनाच्या चालकाची साक्ष-तपासणी करण्यात आली नाही. निशाणी क्रमांक ४६ ही पॉलिसी विमा कंपनीद्वारे दिलेली आहे. उक्त पॉलिसीच्या अटी आणि शर्तींनुसार, विमेदारासह कोणतीही व्यक्ती जीच्याकडे अपघाताच्या वेळी वैध चालक परवाना आहे आणि जी असा परवाना घेण्यास किंवा प्राप्त करण्यास अपात्र नाही, केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ३ च्या आवश्यकता पूर्ण करते, आणि ती व्यक्ती वाहन चालवू शकते.

२१. येथे, सध्याच्या प्रकरणात, बचावाला समर्थन देण्यासाठी, ज्या एकमेव पुराव्यावर अपीलकर्ते अवलंबून होते, तो म्हणजे प्रथम खबरी अहवालाचे कथन आहे. प्रथम खबरी अहवालाच्या कथनामध्ये असे दिसून येते की ९ व्यक्ती गुन्ह्यातील वाहनात प्रवास करत होते. हे मान्य आहे की विमा कंपनीने माहिती देणाऱ्याची साक्ष-तपासणी केली नाही की त्याने कोणत्या आधारावर असा निष्कर्ष काढला की ९ व्यक्ती गुन्ह्यातील वाहनात प्रवास करत होते. प्रथम खबरी अहवालाच्या कथनामध्ये असे दिसून येते की सात व्यक्ती जखमी झाल्याचे त्यांना समजले आणि त्यांना खाजगी वाहनातून उपचारासाठी पाठवण्यात आले. तर, गंभीर जखमी झालेल्या दोघांना रुग्णालयात हलवण्यात आले. त्यांनी या व्यक्तिंना रुग्णालयात हलवले नाही. अशा प्रकारे, प्रथम खबरी अहवालाचे कथन म्हणजे त्याने गोळा केलेल्या माहितीच्या आधारे केले गेले आहे. शिवाय, या सर्व व्यक्ती गुन्ह्यातील वाहनातून प्रवास करत होत्या हे दाखवण्यासाठी त्याने जखमी व्यक्तिंचे कोणतेही निवेदन नोंदवले आहे की नाही हे तपासण्यासाठी विमा कंपनीकडून त्यांची साक्ष -तपासणी केली नाही. या गुन्ह्यातील वाहनातून ८-९ लोक प्रवास करीत होते हे दाखवण्यासाठी विमा कंपनीने कोणत्याही जखमींची तपासणी केलेली नाही. अशा प्रकारे, सहायक पोलीस उपनिरीक्षक रामहरी रतिराम पेठे यांनी गोळा केलेल्या माहितीच्या प्राप्तीबाबत साक्षीदारांची चौकशी करण्याची संधी दावेदारांना देण्यात आली नाही. पॉलिसीच्या अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याबाबत याचना करताना, प्रथम खबरी अहवाल मध्ये त्यांनी केलेल्या विधानाचा आधार घेण्याचे म्हंटले आहे. तथापि, आधी म्हटल्याप्रमाणे, सहायक पोलीस उपनिरीक्षक रामहरी

रतिराम पेठे ह्यांची साक्ष तपासणी केली नाही आणि दावेदारांना साक्षीदारांची उलटतपासणी करण्याची संधी दिली गेली नाही.

२२. विमा कंपनीच्या बचावासाठी, वाहन चालकाने क्षमते पेक्षा जास्त प्रवासी नेले या कारणास्तव पॉलिसीच्या अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याबाबत, माननीय सर्वोच्च न्यायालयाने **२०१७ एमएच.एल.जे. ऑनलाईन (एस. सी.) ७७** मधील **लक्ष्मी चंद - विरुद्ध - रिलायन्स जनरल इन्शुरन्स, २०१६(१) टी एन एम ए सी ४२६ (एस सी)** आणि **मंजीत सिंग - विरुद्ध - नॅशनल इन्शुरन्स कंपनी लि.** या प्रकरणांमध्ये नोंदवलेले कायद्याचे तत्व निश्चित केले आहे की विमा कंपनीला हे सिद्ध करावे लागेल की पॉलिसीचे उल्लंघन झाले आहे, परंतु असे उल्लंघन इतके मुलभूत असले पाहिजे की तो करार संपुष्टात येईल आणि अशा उल्लंघनामुळे अपघात झाला असला पाहिजे. सध्याच्या प्रकरणात ह्या वरील पैलूंचा अभाव दिसून येतो. विमा कंपनीने हे सिद्ध करण्यासाठी कोणताही पुरावा सादर केला नाही जसे की अतिरिक्त प्रवाशांना वाहून नेण्याच्या स्वरूपात झालेले उल्लंघन हे इतके मुलभूत स्वरूपाचे होते की त्यामुळे झालेला अपघात पॉलिसीच संपुष्टात आणेल. अशा प्रकारे, पॉलिसीचे उल्लंघन झाले असल्याचा विमा कंपनीचा युक्तिवाद प्रमाणस्थापित होऊ शकत नाही. नुकसान भरपाईच्या हक्कांच्या पैलूवर, न्यायाधिकरणाच्या विद्वान सदस्याने यापूर्वीच विमा कंपनीला नुकसान भरपाई देण्यास जबाबदार धरले आहे. मी आधीच नोंद केले आहे की विमा कंपनी हे सिद्ध करण्यात अयशस्वी ठरली की अभिकथित अपघात पॉलिसीच्या मुलभूत स्वरूपाच्या उल्लंघनामुळे झाला. अशा प्रकारे, ह्या अपील मध्ये तथ्य आढळत नाही आणि ती फेटाळली जाण्यास पात्र ठरते.

२३. ह्या पार्श्वभूमीवर, पहिले अपील फेटाळले जाते. त्यानुसार मी या मुद्यांप्रमाणे उत्तरे दिली. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

अश्या प्रकारे पहिले अपील निकाली काढले जाते.

(न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके)

अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".